बुधवार, दि ३ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २ रा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

विशेष संपादकीय

## मराठा आरक्षण - विजय, आश्वासनं आणि अनुत्तरित प्रश्न

मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखालील मराठा आरक्षण आंदोलनाने राज्य सरकारला नमवले आहे, यात शंका नाही. हैदराबाद गॅझेटिअरची तात्काळ अंमलबजावणी, नातेवाईकांच्या नोंदींवरून कुणबी प्रमाणपत्र देणे, आधीच्या गुन्ह्यांची मागे घेण्यात आलेली घोषणा, शासकीय नोकरीतील प्राधान्य आणि बलिदान दिलेल्या कुटुंबांना आर्थिक मदत - या सहा मागण्या मान्य करून सरकारने आंदोलनाच्या तापलेल्या वातावरणावर तात्पुरता मलमपट्टी केली आहे. आझाद मैदानातील आंदोलनाचा पडदा खाली आला, पण संघर्षाचा पट अजून संपलेला नाही. सरकारने हैदराबाद गॅझेटिअरवर जलद गतीने निर्णय घेतला, पण 'मराठा आणि कुणबी एकच' या मूळ मागणीवर मात्र पावलं जपून टाकली. अंतरवाली सराटी आंदोलनानंतर तब्बल ५८ लाख नोंदी मिळाल्या, तरीही सरकार या मागणीवर ठोस भूमिका घेऊ शकलेले नाही. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शब्दांत सांगायचं तर - ही प्रक्रिया किचकट आहे. पण हा किचकटपणा मागील काही दशकांत सुटू शकला नाही, आणि आता पुन्हा दोन महिन्यांचा अवधी मागण्यात आला आहे. सरकारचं हे सावध धोरण अनेक प्रश्न निर्माण करतं - सरसकट ओबीसी आरक्षणाच्या मागणीला फाटा देण्यासाठीच का हा वेळ मारून नेण्याचा प्रयत्न? की खरंच कायदेशीर प्रक्रिया जटिल असल्यामुळेच सरकार सावध भूमिका घेत आहे? हैदराबाद गॅझेटिअर लागू झाल्यानंतर मराठवाड्यातील लाखो कुटुंबांना सरळ कुणबी प्रमाणपत्र मिळू शकणार आहे. गावकीत, भावकीत जर नोंदी असतील तर ओबीसीचा लाभ मिळवणे सोपे होईल. या प्रक्रियेतून मराठा समाजातील मोठा वर्ग तातडीने शैक्षणिक आणि नोकरीतील आरक्षणाचा लाभ घेऊ शकेल, हे निश्चित आहे. पण 'सरसकट' आरक्षणाच्या मागणीसमोर ही मर्यादित दिलासा ठरण्याची शक्यता आहे. कारण, ज्या कुटुंबांकडे नोंदी नाहीत, त्यांचा संघर्ष पूर्ववत राहणार आहे. जरांगे यांच्या 'मराठा आणि कुणबी एकच' या घोषणेला ओबीसी नेत्यांकडून जोरदार विरोध होत आहे. मंत्री छगन भुजबळ यांचा इशारा स्पष्ट आहे - ओबीसींच्या आरक्षणावर कुणाचंही अतिक्रमण होऊ देणार नाही. हा विरोध केवळ राजकीय नाही, तर सामाजिक असंतोषाला खतपाणी घालणारा आहे. पुढील काही दिवसांत न्यायालयीन लढाया सुरू होण्याचीही शक्यता आहे. मनोज जरांगे यांनी आंदोलन मागे घेतलं असलं तरी त्यांच्या भाषणातून स्पष्ट होतं की ही फक्त 'विराम' अवस्था आहे, समाप्ती नाही. सरकारने दोन महिन्यांत निर्णय घेतला नाही तर पुन्हा रस्त्यावर उतरण्याची तयारी त्यांनी दाखवली आहे. त्यामुळे पुढील काळात संघर्षाची नवी लाट उसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संपूर्ण प्रकरणातून दोन गोष्टी स्पष्ट होतात - एक, सरकारवर दबाव आल्याशिवाय निर्णय घेतले जात नाहीत, आणि दोन, मराठा समाजाची 'सरसकट ओबीसी आरक्षण' ही मागणी अजूनही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे येणारे दोन महिने हे सरकारसाठी मोठी कसोटी ठरणार आहेत. मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेटिअरची अंमलबजावणी हा एक दिलासा आहे, पण खऱ्या अर्थाने न्याय मिळवण्यासाठी 'सरसकट ओबीसी आरक्षण' हा टप्पा अजून बाकी आहे. सरकारने हा विश्वासघात ठरू न देता, वेळेत आणि पारदर्शकपणे निर्णय घ्यावा, हीच लोकांची अपेक्षा आहे. सरकारने जरी 'आता विजयाचा उत्सव साजरा करा' असा संदेश दिला असला, तरी संघर्ष संपलेला नाही, हे आंदोलनाचं नेतृत्व करणारे मनोज जरांगे आणि त्यांचे समर्थक स्पष्टपणे जाणून आहेत. प्रश्न एकच आहे - दोन महिन्यांत सरकार आपले वचन पाळणार का? की पुन्हा एकदा रस्त्यावर उतरण्याची वेळ येणार?

**- दीपक शेळके**

# सरकार झुकलं, मुख्यमंत्री आलेच नाय!

## घरी निघायचंय दमानं गाड्या चालवा; मनोज जरांगे

### गुलालाची उधळण करुन मराठ्यांचा आनंदोत्सव

**मुंबई -** मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारचे, मंत्रिमंडळाचे आभार मानले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपोषण सोडायला यावं, तुमचं आमचं वैर संपलं असे म्हणत जरांगे पाटील यांनी उपोषण सोडण्यासाठी सरकारपुढे अट ठेवली आहे. तुम्ही या, नका येऊ आमची ही विनंती आहे, असे जरांगे पाटील यांनी म्हटले. त्यावर, आपण हे उपोषण आज सोडूया, उपोषण मागे घ्यावे, नंतर आपण मुख्यमंत्र्यांसमवेत भेटूया असे राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खूप मदत केली, त्यांच्यामुळेच आम्ही इथपर्यंत आलोय, ह्या मागण्या मान्य करू शकलो असे विखे पाटील यांनी म्हटले. त्यानंतर, मनोज जरांगे पाटील यांनी काही वेळातच विखे पाटील यांच्याहस्ते पाणी पिऊन आपले उपोषण सोडले.

आमचं म्हणणं एवढचं आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित दादा आणि आमच्या म राठ्यांमध्ये एक कटुता आहे, ते जर इथं आले तर ती कटुता संपुष्टात येईल पण ते आले नाहीत तर ही कटुता कायम राहिल, असे म्हणत जरांगे पाटील यांनी उपोषण सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांना बोलावले होते. मात्र, विखे पाटलांच्या विनंतीनंतर अखेर जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण मागे घेतलं आहे. मंत्रिमंडळ समितीचा प्रमुख असल्याने मलाच सर्व अधिकार देण्यात आले आहेत, त्यामुळे माझ्यासह मंत्रिमंडळातील सदस्यही आमच्यासोबत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व अधिकार राधाकृष्ण विखे पाटील यांनाच दिले आहेत, त्यामुळे आपण उपोषण सोडावं अशी विनंती असल्याचे उदय सामंत यांनी म्हटले. त्यानंतर, मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलकांना विचारत राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते पाणी




पिऊन उपोषण सोडले. तसेच, दमानं गाड्या चालवा म्हणत मुंबईतून आता गावाकडं जायचंय, घरी निघायचं असे आवाहनही केले.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या ५ दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाच्या माध्यमातून पुन्हा एकदा म राठा आरक्षणाची लढाई सुरू केली होती. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची प्रमुख मागणी करत हैदराबाद आणि सातारा गॅझेटचीही मागणी केली होती. यासह, मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याची आणि आंदोलनादरम्यान मृत्यू पावलेल्या मराठा आंदोलकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व नोकरी देण्याची मागणी केली होती. राज्य शासनाच्यावतीने आज मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह इतर सदस्यांनी आझाद मैदानात जाऊन उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांना उपोषण सोडण्याची विनंती केली. तसेच, सरकारने आपल्या सर्व म ागण्या मान्य केल्या असून मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय काढण्यासाठी २ महिन्यांचा कालावधी मागितला आहे. तर इतर मागण्याचे शासन निर्णय जारी केले आहेत. त्यानुसार, अखेर शासनाने हैदराबाद गॅझेट आणि इतर म ागण्याचे शासन निर्णय जारी केल्यानंतर मनोज जरांगे पाटील

पान २ वर

# रक्तातील सर्वांनाच कुणबी प्रमाणपत्र - फडणवीस



**मुंबई -** मला कितीही शिव्या दिल्या, दोष दिले तरी मी सगळ्या समाजासाठी काम करणार. मराठा उपसमितीने एक चांगला तोडगा काढला आणि कायद्याच्या चौकटीत बसेल असा निर्णय घेतला अशी पहिली प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी झाल्यामुळे ज्यांच्या कुणबी नोंदी सापडतील त्यांना, त्यांच्या रक्तातील सर्वांनाच कुणबी सर्टिफिकेट मिळणार असल्याचं फडणवीसांनी जाहीर केलं. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची सांगता झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यमांशी बोलत होते.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांचे गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेले आंदोलन मागे घेण्यात आलं. मनोज जरांगे यांनी केलेल्या आठपैकी सहा मागण्या मान्य झाल्या. त्यामधील हैदराबाद गॅझेट लागू करण्याची प्रमुख मागणी मान्य झाली. त्याचा फायदा मराठवाड्यातील बहुतांश मराठ्यांना होणार आहे.

हैदराबाद गॅझेट लागू करण्यासाठी आमची सुरुवातीपासून तयारी होती. पण त्यामध्ये मनोज जरांगेंची मागणी ही सरसकटची होती. त्यामध्ये कायदेशीर अडचणी होत्या. न्यायालयाचे निर्णय पाहता ते शक्य नव्हतं. ही गोष्ट आम्ही जरांगेंच्या लक्षात आणून दिली. आपल्या कायद्याप्रमाणे, संविधानाप्रमाणे आरक्षण हे समूहाला नसतं तर ते व्यक्तीला दिलं जातं. त्यामुळे सरसरट करता येणार नाही, ते कायद्याच्या पातळीवर टिकणार नाही हे सांगितलं. त्याला जरांगे यांनी मान्यता दिली. त्यानंतर उपसमितीने चर्चा केली आणि जीआर तयार केला.

राधाकृष्ण विखे पाटील आणि उपसमितीतील सर्व प्रमुख नेत्यांचं मी आभार मानतो. त्यांनी सातत्याने बसून, अभ्यास करून हा मार्ग काढला आहे. जे मराठवाड्यात राहणारे, ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, रक्त-नात्यातील कुणाचाही कुणबी उल्लेख असेल तर त्याला कुणबी सर्टिफिकेट मिळणार. हैदराबाद गॅझेटच्या माध्यमातून, ज्यांना पुरावा मिळेल त्यांना आरक्षण मिळणार.

ज्याच्याकडे पुरावा नाही त्याला याचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का बसणार नाही असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मराठवाड्यात रेकॉर्ड्स नाहीत. त्या ठिकाणी

पान २ वर

# इतिहास, भूगोल आणि प्रेरणादायी वारसा; किल्ले शिवनेरी

सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेला शिवनेरी किल्ला केवळ एक किल्ला नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय स्मृतीचिन्ह आहे. जुन्नर शहराच्या उत्तरेला उभा असलेला हा गड जणू त्या भूमीचा रक्षक बनून शतकानुशतके उभा आहे. इथे प्रत्येक दगड, प्रत्येक कडा, प्रत्येक तट इतिहासाची गाथा सांगतो.

इ.स. सहाव्या शतकापासून अस्तित्वात असलेला शिवनेरी किल्ला म हाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. सुरुवातीला हा किल्ला एक महत्त्वाचा लष्करी ठाणे म्हणून उभारण्यात आला होता. अनेक राजवटींनी या किल्ल्यावर आपले वर्चस्व गाजवले. मात्र, भोसले घराण्याच्या काळात याला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

१५९५ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्या ताब्यात हा गड आला. याच ठिकाणी, १९ फेब्रुवारी १६३० रोजी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. या किल्ल्याच्या साक्षीने त्यांचे बालपण घडले. ज्या किल्ल्यावर एका युगपुरुषाने पहिला श्वास घेतला, तो किल्ला स्वाभाविकच असामान्य तेज आणि पावित्र्य लाभलेला ठरतो. बालवयातच त्यांनी राज्यकारभार, युद्धकला आणि मुत्सद्देगिरीचे धडे येथेच गिरवले.

शिवनेरीचा निसर्गसंपन्न परिसर, मजबूत तटबंदी आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून केलेली रचना पाहिल्यास शहाजी राजांनी हा किल्ला निवडण्यामागचे महत्त्व लक्षात येते. शिवनेरीवर झालेल्या संस्कारांमुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली.

शिवनेरीचे महत्त्व केवळ त्याच्या संरक्षणात्मक रचनेत नाही तर त्याच्या सामरिक स्थानातही दडलेले आहे. नाणेघाट आणि माळशेज घाट या प्राचीन व्यापारी मार्गांवर नजर ठेवणाऱ्या या किल्ल्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांना व्यापारावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य होत असे. सातवाहनांच्या काळापासून या घाटखिंडी पश्चिम किनाऱ्यावरील समृद्ध बंदरांना देशाच्या आतील प्रदेशाशी जोडत होत्या. त्यामुळे या परिसरावर नियंत्रण म्हणजे व्यापार, सत्ता आणि सामरिक बळ या तिन्ही गोष्टींवर पकड मिळविणे होय. म्हणूनच, पुढे कुठलाही राजवंश आला तरी शिवनेरीवर नियंत्रण मिळवणे हे त्यांच्यासाठी अनिवार्यच होते.

शिवनेरीची रचना ही युद्धकौशल्याचे अद्वितीय उदाहरण आहे. डोंगरकड्यांचे नैसर्गिक बळ आणि त्याला जोडलेली भक्कम चिरेबंदी, तटबंदी यामुळे हा किल्ला जवळपास अभेद्यच मानला जात असे. साधारणपणे साडेतीन हजार फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी सात दरवाज्यांतून जावे लागते. हे दरवाजे वळणदार व गुंतागुंतीच्या पद्धतीने बांधलेले असल्यामुळे शत्रू गोंधळून जाई, त्याचा वेग मंदावला जाई आणि मग गडावरून हल्ला चढविणे सोपे होई.

किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर एक विस्तीर्ण पठार दिसते. त्यात निवासासाठी घरे, धान्यसाठ्याची कोठारे, तसेच प्रस्तरात खोदलेली पाण्याची मोठी टाकी आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेत किंवा शत्रूच्या दीर्घकाळ चालणाऱ्या वेढ्यातही या पाणीसाठ्यामुळे गडाची स्वायत्तता टिकून राहायची. किल्ल्याच्या उत्तरेला 'कडेलोट' नावाचा उग्र कडा आहे, जिथून शत्रूंना खाली फेकले जात असे.

किल्ल्याच्या आत शिवाई देवीचे मंदिर आहे. शिवनेरी हा केवळ सैन्यदृष्ट्या महत्त्वाचा गड नाही, तर धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही पूज्य मानला जातो.

आजही शिवनेरी महाराष्ट्राच्या लोकम नसात अपार आदराचे स्थान राखतो. दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हजारो शिवभक्त, शाळकरी मुले, इतिहासप्रेमी व पर्यटक या दिवशी गडावर एकत्र येतात. शिवनेरीचा गगनभेदी निनाद त्यांना धैर्य, शौर्य आणि स्वराज्याच्या विचारांनी प्रेरित करतो.


शिवनेरी किल्ल्याचा प्रवास केवळ ऐतिहासिक सफर नसून, त्याच्या आसपासच्या परिसरात अनेक अद्भुत ठिकाणे आहेत. इथे इतिहास, अध्यात्म आणि निसर्गसौंदर्य यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. किल्ल्यापासून अवघ्या पाच किलोमीटरवर लेण्याद्री लेण्या आहेत. या प्राचीन बौद्ध लेण्या उत्कृष्ट शिल्पकलेचे दर्शन घडवतात. याच गुंफांमध्ये असलेले गिरीजात्मज मंदिर अष्टविनायकांपैकी एक असून, गणेशभक्तांसाठी हे पवित्र स्थळ आहे. गुंफांपर्यंतच्या चढाई दरम्यान दिसणारे विस्तीर्ण निसर्गदृश्य मन मोहून टाकते.

शिवनेरीपासून दहा किलोमीटरवर असलेली ओझर आणि गिरीजात्मज गणपती मंदिरे भक्तांसाठी विशेष आकर्षण आहेत. विघ्नहर गणेशाला समर्पित असलेले ओझर मंदिर देखण्या वास्तू कलेसाठी प्रसिद्ध आहे. इथली शांत आणि भक्तिमय वातावरण प्रार्थनेसाठी पोषक आहे. निसर्ग प्रेमींसाठी माळशेज घाट हे रमणीय स्थळ शिवनेरीपासून तीस किलोमीटरवर आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, वाहणारे धबधबे आणि जैव विविधतेने नटलेला परिसर इथे पाहायला मिळतो. पावसाळ्यात तर हा संपूर्ण प्रदेश हिरव्यागार शालूत नटतो. साहस प्रेमींनी नाणेघाटाला भेट द्यायलाच हवी. हा प्राचीन व्यापारी मार्ग आणि ट्रेकिंगचे प्रसिद्ध ठिकाण पस्तीस किलोमीटरवर आहे. इथल्या कोरीव शिला लेखांमधून शतकांपूर्वीच्या व्यापाऱ्यांच्या आठवणी जपल्या गेल्या आहेत. नाणेघाटातून सह्याद्री पर्वतरांगांचे विस्मयकारक दृश्य दिसते. केवळ सहा किलोमीटरवर जुन्नर लेण्या आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी कोरलेल्या या बौद्ध लेण्यांमध्ये चैत्यगृह आणि विहारांचा समावेश आहे. कोरीव नक्षीकाम, प्राचीन काळातील भिक्षूंचे वास्तव्य आणि शिल्पकला यामुळे हे ठिकाण विशेष आहे. इतिहास, अध्यात्म आणि निसर्ग यांचा सुंदर मि लाफ असलेल्या शिवनेरी आणि त्याच्या आजूबाजूच्या ठिकाणांना भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरतो.

युनेस्कोच्या जागतिक वारसा मानांकन यादीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, शिवनेरीलाही त्या सन्माननीय श्रेणीमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे शिवनेरीला जागतिक स्तरावरही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

खरे तर, शिवनेरी हा केवळ दगड आणि मातीचा किल्ला नाही तर तो आहे धैर्याचा स्रोत, चारित्र्याचा आधार आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक. शिवनेरी किल्ला हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून महाराष्ट्राच्या अभिमान, शौर्य आणि परंपरेचे प्रतीक आहे. इतिहासप्रेमी, ट्रेकिंगसाठी उत्सुक किंवा संस्कृतीचा अभ्यास करणारे पर्यटक इथे एक अद्वितीय अनुभव घेऊ शकतात. किल्ल्याच्या भव्यतेचा अनुभव घेत असताना, त्या महान युगाचा साक्षीदार होण्याची संधी लाभते, ज्या काळाने भारताच्या भवितव्याला आकार दिला. इथल्या सुळक्यांवर उभे राहून सह्याद्रीच्या विस्तीर्ण रांगांचे सौंदर्य डोळ्यांत साठवता येते. शिवनेरीचा प्रत्येक दगड, प्रत्येक तटबंदी आणि प्रत्येक वाट इतिहासाचे सोनेरी पान उलगडते.

**- संजय डी.ओरके**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**



**मराठा आरक्षण मनोज जरांगे यांनी अखेर आरक्षण मिळविले आहे. याचा जल्लोष परतूर येथील महादेव मंदिर चौकात गुलाल उधळून करण्यात आला. यावेळी मराठा बांधवांची उपस्थिती होती.**

## अनुकंपाधारक उमेदवारांच्या रिक्तपदाच्या नियुक्तीसाठी मेळावा संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या एकुण १ ते ९ टप्यांमधील टप्पा क्र. ५ ( मेळावा घेणे व शिफारस करणे) पूर्ण करण्याच्या अनुषंगाने (दि. २) आज जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे प्रतिक्षासूचीतील सर्व अनुकंपाधारक उम ेदवार यांचा मेळावा घेवुन रिक्तपदांसाठी पसंतीक्रम विहित नमून्यामध्ये घेण्यात आले.

गट-क संवर्गासाठी एकूण १७ पदे रिक्त असून प्रतिक्षासुचीमध्ये ४१ अनुकंपाधारक आहेत. या रिक्त पदांवर गट-क संवर्गातील अनुकंपाधारक यांची शैक्षणिक व इतर अर्हतेनुसार नियुक्ती करिता शिफारस करण्यासाठी सदर मेळाव्यामध्ये अनुकंपाधारक यांचेकडुन रिक्त पदाबाबतचा पंसतीक्रम भरुन घेण्यात आला असून, त्यानुसार गट-क संवर्गातील अनुकंपाधारक यांची नियुक्तीसाठी नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे शिफारस करण्यात येणार आहे. सुरुवातीस मेळाव्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रास्ताविक करुन, मेळाव्याचा उद्देश, प्राप्त रिक्त पदाबाबत माहिती, अनुकंपाधारक यांचे शैक्षणिक अर्हतेबाबतची माहिती तसेच पंसतीक्रम कशाप्रकारे दयावा याबाबत माहिती दिली. अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी उपस्थित सर्व अनुकंपाधारक यांचे शंकाचे निरसन करून, त्यांना मार्गदर्शन केले. या मेळाव्यास उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सरिता सुत्रावे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनिषा दांडगे आदि उपस्थिती होते. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविली आहे.

## पोलिस पाटील भरतीसाठी ४ सप्टेंबरला आरक्षण सोडत

**जालना । प्रतिनिधी** - जालना उपविभागातील समाविष्ट असणाऱ्या जालना व बदनापूर तालुक्यातील एकुण १८५ गावांतील पोलिस पाटील रिक्त पदाची भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. तरी पोलिस पाटील रिक्त पदाची भरती प्रक्रियेसाठी गावनिहाय, जात प्रवर्गनिहाय, रिक्त पदाच्या तीस टक्के महिला आरक्षण सोडत गुरुवार दि.४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील म हसूल भवनात काढण्यात येणार आहे. पोलिस पाटील सरळसेवा एकुण मंजूर पदे २२६ असून ४१ पदे भरलेली आहेत तर १८५ पदे रिक्त आहेत. ज्या नागरिकांना आरक्षणावर आक्षेप, हरकत असेल त्यांनी लेखी स्वरुपात आपले आक्षेप उपविभागीय अधिकारी, जालना येथे समक्ष उपस्थित राहून दि.८ ते १० सप्टेंबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जालना उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## जिल्ह्यातील शेतरस्त्यांना सीमांकनासह क्रमांक देण्याची मोहीम सुरु

**जालना** - जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. आता जिल्ह्यातील सर्व शेतरस्त्यांचे सीमांकन करून त्यांना विशिष्ट क्रमांक दिले जाणार आहेत. शेतामध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी तसेच शेतीमाल बाजारात नेण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत गरजेचे असल्याने शासन निर्णयानुसार ही कार्यपद्धती अम लात आणली जात आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली.

गावनिहाय शेतरस्त्यांची सविस्तर यादी तयार करण्यासाठी ग्रामसेवक, तलाठी, कोतवाल आणि पोलिस पाटील यांच्या मदतीने शिवार फेऱ्या आयोजित केल्या जाणार आहेत. या फेऱ्यांदरम्यान वापरात असलेले, अतिक्रमित तसेच नकाशावर नसलेले रस्ते नोंदवले जातील. **प्रपत्र क्र. १ - नकाशावर असलेले रस्ते, प्रपत्र क्र. २ - नकाशावर नसलेले पण प्रत्यक्ष वापरात असलेले रस्ते** तयार झालेली प्राथमिक यादी ग्रामसभेत मांडली जाईल, ग्रामस्थांच्या संमतीनंतर अंतिम यादी तहसीलदारांकडे पाठवली जाईल. सीमांकनासाठी भूमि अभिलेख विभागाकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, हेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. याशिवाय, सीमांकन झालेल्या रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्याच्या पूर्वीच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही होईल. अतिक्रमण झालेल्या रस्त्यांसाठी माम लेदार न्यायालय अधिनियम, १९०६ अंतर्गत संबंधितांना नोटिसा बजावून सुनावणी घेतल्यानंतर अतिक्रमण हटवले जाईल.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# गणेशोत्सवाची प्रबोधनात्मक भित्तिपत्रके लावल्यावरून सनातनच्या साधकाचा पोलिसांकडून बेकायदेशीर डांबून छळ!

## दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाईची सनातन संस्थेची मागणी

**मुंबई** - गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील शिवडी परिसरात 'आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा' अशा आशयाची प्रबोधनात्मक भित्तिपत्रके लावणाऱ्या श्री. संदीप हरिश्चंद्र शिंगाडे या सनातनच्या साधकाला किडवाई मार्ग पोलिसांनी कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेशिवाय ताब्यात घेऊन दीड तास त्यांचा छळ केला. पोलिसांच्या या मनमानी आणि दडपशाहीचा आम्ही सनातन संस्थेच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करतो. या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री आणि मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिली.

२६ ऑगस्ट २०२५ या दिवशी रात्री ७:३० वाजता 'आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा' या विषयाचे भित्तिपत्रक लावत असतांना कोळेकर, कांबळी आणि राम सिंग या नावाच्या पोलिसांनी सनातनचे साधक श्री. शिंगाडे यांना कोणतेही वॉरंट किंवा कारण न देता जबरदस्तीने पोलीस ठाण्यात नेणे; रात्री ९ वाजेपर्यंत घाडगे नावाच्या पोलीस अधिकाऱ्याने चौकशीच्या नावाखाली त्यांच्या मानसिक छळ करणे; चौकशीदरम्यान धमक्या देणे; वैयक्तिक मोबाईल काढून त्यातील वैयक्तिक माहिती घेणे; त्यांच्या फोनमधील कॉल लॉग्स व वैयक्तिक कागदपत्रांचे फोटो काढणे; साधकाला त्यांच्या वकिलाशी वा कुटुंबियांशी संपर्क साधू न देणे; तसेच रात्री ९ वाजता त्यांना कोणताही कागदोपत्री पुरावा न देता सोडून देणे, ही संपूर्ण कारवाई 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' (BNSS) च्या कलम ३५ चे सरळ उल्लंघन करणारी आहे. तसेच हा पोलिसांनी केलेल्या अधिकारांच्या दुरुपयोगाचा गंभीर नमुना आहे, असे श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

श्री. अभय वर्तक पुढे म्हणाले की , गणेशोत्सवाच्या काळात गणेशपूजनाचे शास्त्र, गणेशाची कृपा कशी संपादावी, आदर्श गणेशोत्सव कसा साजरा करावा, याविषयी प्रबोधन करणे गुन्हा आहे का ? हा भारतीय संविधानाने दिलेल्या हिंदूंच्या धार्मिक स्वातंत्र्यावर पोलीस प्रशासनाने घातलेला घाला आहे. कधी पोलिसांनी मुसलमान अथवा ख्रिश्चन धर्मियांना त्यांच्या धार्मिक कृतीविषयी माहिती सांगतांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊन छळ करण्याचे धाडस केले आहे का ? याचे उत्तर किडवई मार्ग पोलिसांनी जनतेला द्यावे ! हिंदू सणांच्या वेळी हिंदूंची ही मुस्कटदाबी आम्ही कदापी सहन करणार नाही. जर दोषी अधिकाऱ्यांवर मुंबई पोलीस आयुक्तांनी तात्काळ कायदेशीर कारवाई केली नाही, तर आम्ही या विरोधात महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करू, तसेच दोषींना शिक्षा होईपर्यंत सनातन संस्था या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करणार आहे, असेही श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

## पान १ वरुन

### सरकार झुकलं ...

यांनी आपले उपोषण मागे घेतले. मुंबईतील आझाद मैदानात मराठा आंदोलकांनी एकच जल्लोष केला, गुलालाची उधळण करुन आनंदोत्सव साजरा केल्याचं पाहायला मिळालं.

मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यातील मराठा समाजाला कुणबी संबोधून शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य खात्याच्यावतीने हैदराबाद गॅझेटचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. आपल्या वाचकांसाठी हैदराबाद गॅझेट शासन निर्णय जसाच्या तसा..

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील मराठवाडा हा एक वैविध्यपूर्ण असा ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक ठेवा असणार प्रदेश आहे. मराठवाड्यातील सामाजिक, भौगोलिक आणि प्रादेशिक परिस्थिती ही उर्वरीत महाराष्ट्रापेक्षा वेगळी आहे. महाराष्ट्राच्या मध्य विभागात असणारा हा भौगोलिक प्रदेश संतांची भूमी म्हणून पूर्ण देशात प्रसिध्द आहे. मराठवाड्यात इतिहासकालीन प्रसिध्द अशा सातवाहन राजाने राज्य केलेले आहे. पैठण (प्रतिष्ठाण) ह त्यांची राजधानी होती. यानंतर वाकाटक, चालुक्य, यादवकालीन अशा पराक्रमी घराण्यांनी मराठवाडा आणि परिसरावर राज्य केले आहे. देवगिरीचा ऐतिहासिक किल्ला हा या राजांच्या शौर्याचे आणि सामर्थ्याचे प्रतिक म्हणून आज सुध्दा त्याच दिमाखाने उभा आहे. अशा या अतिशय प्राचीन आणि ऐतिहासिकदृष्ट्या समृध्द वारसा असणार मराठवाडा दि.१७ सप्टेंबर, १९४८ साली भारतात विलीन झाला. या काळात या संतभूमितून औंढा नागनाथ घृष्णेश्वर, परळी-वैजनाथ, माहूरगड, तुळजापूर, पैठण, आपेगाव, नरसी नामदेव व तेर अशी समृध्द तिर्थक्षेत्र निर्माण झाली. जगभरात प्रसिध्द असणारे आणि वैविध्यपूर्ण कलाशिल्पाने नटलेले अजिंठा व वेरूळ येथील लेणी आहेत.

मराठवाड्याच्या ऐतिहासिक भूमितून संतश्रेष्ठ नामदेव, निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, गोरा कुंभार, जनाबाई, जगमित्र नागा, एकनाथ, सेना न्हावी व जनार्दन स्वामी अशा महनीय संतांनी या भूमिमध्ये सहिष्णूता, भागवत धर्माचा प्रसार, भूतदया, समानतेचा संदेश दिला आहे. तसेच श्री गुरू गोविंद सिंघजी यांची समाधी नांदेड येथे असून त्याठिकाणी शीख धर्मीय मोठ्या प्रमाणात दर्शनाकरिता येत असतात. या कारणाने मराठवाड्यात आजसुध्दा सर्व धर्म समभावाची वीण कायम आहे. मराठवाड्यातून मुख्यतः गोदावरी, पूर्णा व मांजरा या नद्या वाहतात. या नद्याने यांतील जनजीवन काही प्रमाणात समृध्द केले आहे. गोदावरी ही महाराष्ट्राची जीवनदायिनी असून मोठ्या प्रमाणात नागरी समूह या नदीच्या तिरावर वसलेला आहे.

असा हा मराठवाडा महाराष्ट्रात दि. ०१ नोव्हेंबर, १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई प्रांतात सामील झाला आणि दि.०१ मे, १९६० पासून मराठवाडा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग बनला आहे. तत्कालिन निजाम सरकारमध्ये मराठवाडा विभागाची प्रशासकीय रचना ही निजाम सरकार नियंत्रित होती. अशा परिस्थितीमध्ये तत्कालीन इंग्रज राजवट व निजाम राजवट यांच्या प्रशासकीय पध्दतीमध्ये बऱ्याच अंशी तफावत आढळते. या संपन्न अशा मराठवाड्यात अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात आरक्षणाच्या अनुषंगाने आंदोलने सुरू झाली आहेत. त्यासाठी या भागातील कुणबी, कुणबी मराठा तसेच मराठा- कुणबी यांच्या नोंदी शोधण्यासाठी आणि या भागातील सदरहू जनतेला न्याय देण्याच्या अनुषंगाने दि.०७ सप्टेंबर, २०२३ रोजी मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीला मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये नोंदी शोधण्याकरिता आवश्यक ती यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली. समितीने मराठवाड्यातील विविध शासकीय कार्यालयातील उपलब्ध असणारी सर्व प्रकारची कागदपत्रे तपासून आतापर्यंत न सापडलेल्या कुणबी जातीच्या बऱ्याच प्रमाणात नोंदी शोधल्या आहेत. उक्त समितीमार्फत मराठवाड्यात जिल्हानिहाय भेटी/दौरे करून बैठका घेण्यात आल्या. आवश्यकतेनुसार हैदराबाद गॅझेट आणि तत्कालीन काळात निजाम सरकारची राजधानी याकारणाने समितीने दोन वेळा हैदराबाद येथील पुराभिलेख विभागास आणि महसूल विभागास भेटी देऊन सुमारे ७ हजारपेक्षा अधिकची कागदपत्रे अभ्यासाकरिता प्राप्त करून घेतली आहेत. तसेच, देशाची जनगणना आणि त्याअनुषंगाने तत्कालीन निजाम सरकारकडील कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याकरिता दिल्ली येथील जनगणना कार्यालय आणि त्यांच्या ग्रंथालयास भेट देऊन अधिकची कागदपत्रे उपलब्ध करून घेतली आहेत. याचदरम्यान दिल्ली येथील राष्ट्रीय पुराभिलेख कार्यालयात भेट देऊन तत्कालीन निजाम सरकारकडील कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय मराठवाड्यातील ज्यांच्याकडे वैयक्तिक कागदपत्रे जी जातीची प्रमाणपत्रे मिळण्यासाठी उपयोगी ठरतील ती कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही केलेली आहे. मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीने गेल्या दोन वर्षात सातत्याने मराठवाड्यात आणि महाराष्ट्रातील कुणबी नोंदी शोधण्याकरिता मोठ्या प्रमाणात क्षेत्रिय यंत्रणेमार्फत कार्यवाही केलेली आहे. मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीने आतापर्यंत विविध शिफारशीसह सादर केलेल्या अहवालांमधील सर्व शिफारशी शासनाने स्विकारल्या आहेत व याआधारे विविध विभागामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे. यापुढेही सदर समितीने दिलेल्या अहवालांवर योग्य कार्यवाही केली जाणार आहे.

तथापि, मराठवाड्यामध्ये यापेक्षा बऱ्याच प्रमाणात कुणबी-मराठा समाज असून त्यांना जात प्रमाणपत्रे मिळण्याकरिता हैदराबाद गॅझेट लागू करण्यात यावे, अशा प्रकारची मागणी वारंवार होत आहे. मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीस हैदराबाद, सातारा व बॉम्बे गॅझेट लागू करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निदेशित करण्यात आले असून, त्याकरिता उक्त समितीस दि.३१ डिसेंबर, २०२५ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने हैदराबाद व दिल्ली येथे दौरे करून तत्कालीन निजाम सरकारमधील पाच जिल्ह्यांची (औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड व उस्मानाबाद) माहिती प्राप्त करून घेतली आहे व सदरहू कागदपत्रांचा अभ्यास करण्यात येत आहे. तत्कालीन निजाम सरकारमध्ये कुणबी जातीस कापू या नावाने ओळखले जाई, त्यांचा मुख्य व्यवसाय शेती करणे हा होता. या कागदपत्रांमध्ये / गॅझेटिअरमध्ये (सन १९२१ व सन १९३१) कुणबी/कापू अशा नोंदी आहेत. यापुर्वी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या कलम १८ च्या पोट कलम १ मध्ये आणि नियम, २०१२ च्या नियम ४ मधील उप-नियम (२) मधील खंड (च) मध्ये (च) नंतर विविध अभिलेखांचा समावेश करण्याकरिता अधिसूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२४, दि.१८ जुलै, २०२४ अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार, मराठा समाजास कुणबी, कुणबी-मराठा, मराठा कुणबी जातीची प्रमाणपत्रे मिळण्यास उपयोग झालेला आहे. आता, मराठा समाजास जात प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रक्रियेत अधिक सुलभता यावी, याकरिता शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय**

संदर्भाधीन वाचा क्र.१ व क्र. ३ अन्वये जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करणे याकरिता सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३ व त्याअंतर्गत कार्यपध्दती निश्चितीकरिता नियम तयार करण्यात आलेले आहेत. यामध्ये हैद्राबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी चौकशी करुन सक्षम प्राधिकाऱ्यास सहाय्य करण्याच्या दृष्टीने अहवाल देण्यासाठी गावपातळीवर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहेः -

**समिती सदस्यः -**

१. ग्राम महसूल अधिकारी
२. ग्रामपंचायत अधिकारी
३. सहायक कृषी अधिकारी

मराठा समाजातील भुधारक तसेच भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईने शेती करत असलेल्या व्यक्तींकडे शेत जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांनी दि. १३.१०.१९६७ पूर्वी ते किंवा त्यांचे पूर्वज संबंधित स्थानिक क्षेत्रांमध्ये राहत असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे. या प्रतिज्ञापत्राच्या आधारे दिलेल्या अनुषंगिक पुराव्याचे सक्षम प्राधिकारी यांनी स्थानिक चौकशी करून खातरजमा करावी. अशा स्थानिक चौकशीमध्ये संबंधित जातीचा दावा करणाऱ्या व्यक्तीचे गावातील / कुळातील नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास व दावा करणारा व्यक्ती हा त्यांच्या नातेसंबंधातील/कुळातील असून कुणबी असल्याचे प्रतिज्ञापत्र देण्यास ते तयार असल्यास, तसे प्रतिज्ञापत्र घेऊन उपरोक्त नमूद गावपातळीवरील स्थानिक समिती, वंशावळ समितीच्या सहाय्याने आवश्यक ती चौकशी करेल. त्या चौकशीच्या आधारे सक्षम प्राधिकारी अर्जदारास कुणबी जातीचा दाखला देण्याबाबत निर्णय देतील, असा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने, हा निर्णय देण्यात आला असून सामाजिक न्याय विभागाच्या उपसचिव वर्षा देशमुख यांच्या सहीने हा आदेश प्राप्त झाला आहे.

### रक्तातील सर्वांनाच ...

नोंदीचा हा प्रश्न गंभीर होता. त्यावर आम्ही संविधानिक तोडगा काढला. तो कोर्टातही टिकणार आहे असंही ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माझ्यावर टीका झाली तरी मी जराही विचलित झालो नाही, कारण समजाला न्याय द्यायचा हेच ध्येय होतं. तो न्याय देताना दोन समाजात तेढ निर्माण होणार नाही, अन्यायाची भावना निर्माण होणार नाही असा कायदेशीर निर्णय करावा लागेल. मराठा असो, ओबीसी असो वा महाराष्ट्रातील कोणताही समाज असो, प्रत्येक समाजासाठी काम करणं हे माझं कर्तव्य समजतो. त्या कर्तव्यावेळी कधी शिव्या मिळतात तर कधी फुलांचे हार देखील मिळतात.

युवा आदर्श
जालना बुधवार, दि ३ सप्टेंबर २०२५ ❍ E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# हा खरा उत्सव; भक्ती आणि मानवतेचे सुंदर मिश्रण

## विघ्नहर्ता मंडळाने दिला निवासी अपंग शाळेतील मुला-मुलींना आरतीचा मान





**जालना । प्रतिनिधी -** बडी सडक येथील विघ्नहर्ता गणेश मंडळ यंदा गणेशोत्सवात केवळ भक्तिभाव नव्हे तर सामाजिक बांधिलकीचे सुंदर दर्शन घडवत आहे. नेहमीच्या पारंपरिक पद्धतीकडे जाऊन मंडळाने यावर्षी एक अनोखी आणि भावनिक अशी उपक्रमाची शृंखला राबवली आहे. मंडळातर्फे आज जालन्यातील निवासी अपंग शाळेतील मुलांना गणरायाच्या आरतीचा मान देण्यात आला. मंडळातील स्वयंसेवकांनी या मुलांना शाळेतून घेऊन जाण्याची आणि पुन्हा परत आणण्याची सर्व व्यवस्था केली होती. मुलं मंडळात पोहोचताच मंडपात वातावरणच बदललं, गणरायाच्या आरतीच्या गजरात मुलांच्या निरागस चेहऱ्यावरील आनंदाचे हास्य भक्तांच्या डोळ्यात पाणी आणणारे होते.

मंडपात आल्यावर मुलांसाठी वेगवेगळ्या खेळांचीही खास व्यवस्था होती. मिकी माऊसच्या आकाराचं घर, पाण्यात गाड्या चालवण्याचे खेळ, झोके, जंपिंग लेदरवर उड्या मारणे अशा विविध खेळांमध्ये मुलांनी मनसोक्त धमाल केली. हा अनुभव त्यांच्या दैनंदिन आयुष्यापेक्षा वेगळा आणि आनंददायी ठरला. खेळानंतर मंडळाकडून मुलांसाठी भोजनाचीही खास सोय करण्यात आली होती. गोडधोड पदार्थ आणि जेवणाचा त्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला. त्यांच्या डोळ्यांत चमक आणि चेहऱ्यावर समाधानाचे भाव स्पष्टपणे दिसत होते.

या उपक्रमाबद्दल मंडळाचे अध्यक्ष म्हणाले, गणपती बाप्पा हे सुखकर्ते-दुखःहर्ते तर आहेतच ते सर्वांसाठी आनंदाचे स्रोत देखील आहेत. या मुलांसोबत वेळ घालवून, त्यांच्यासोबत गणरायाची आरती करून आम्हालाही अपार समाधान मिळाले आहे.

शहरातील नागरिकांकडून या उपक्रमाचं कौतुक केले जात आहे. हा खरा गणरायाचा उत्सव असून भक्ती आणि मानवतेचं सुंदर मिश्रण अशा शब्दांत मंडळाचं अभिनंदन केलं जात आहे.

अशा प्रकारच्या उपक्रमामुळे गणेशोत्सव फक्त डिजे अन् ढोल-ताशांच्या गजरापुरता मर्यादित राहत नाही, तर तो समाजाशी एकरूप होतो आणि आनंदाचा खरा अर्थ उलगडून दाखवतो.

---

**युवा आदर्श**

**आवाज ...**

**आवाज वाढवे डिजे**
**शपथ त्याला घातली**
**रस्त्यावरती धिंगाणा**
**मदमस्त पोरे मातली**
**नववर्षाचे सेलिब्रेशन**
**अख्खी रिचव बाटली**
**नशेमध्ये बेबंध धुंदी**
**अरे तरूणाई बाटली**
**पडदे फुटले कानाचे**
**जिवावर पहा बेतली**
**आजारी आहे शेजारी**
**काळजी कुणी घेतली**
**अभ्यासात मुले व्यग्र**
**फिकीर नाही आपली**
**काय करायचे आपण**
**वृध्द माणसे झोपली**
**पोलिसां द्या चिरीमिरी**
**कायदा भिती न उरली**
**ध्वनी प्रदुषण ऐशी तैशी**
**लोकांची भली जिरली**
**कोण पाहतो डेसिबल**
**मस्ती जास्ती अंगातली**
**नगरसेवक आपलाचं**
**गुपीतगोष्ट ही आतली**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस सेवा पंधरवाडा म्हणून साजरा करा

## भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन



**जालना । प्रतिनिधी -** येत्या १७ सप्टेंबर २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आहे. सेवा परमोधर्म उच्चारत पंतप्रधाननी गरीब, शोषित वंचित यांच्या विकासासाठी सरकारच्या माध्यमातून प्रशसनीय कार्य केले आहे. पंतप्रधानांचा वाढदिवस सेवा पंधरवाडा म्हणून भाजपाच्या सर्व निर्वाचित जिल्हा पदाधिकाऱ्यांनी साजरा करण्याचे आव्हान भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांनी केले. भाजपा जिल्हाध्यक्ष आ. कुचे यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना झूम मीटिंग द्वारे मार्गदर्शन करताना सांगितले की ज्याप्रमाणे आपण महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस सेवा पंधरवडा म्हणून साजरा केला त्याचप्रमाणे देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस हा १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोंबर २०२५ पर्यंत राबवून त्यामध्ये स्वच्छता अभियान, एक पेड मा के नाम, वृक्षरोपण कार्यक्रम, आरोग्य शिबीर, प्रबुद्ध नागरिक संवाद, दिव्यांग व अन्य प्रतिभावना व्यक्तीचा सन्मान पंडीत दिनदयाल जयंती २५ सप्टेंबर व महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोंबर आदीसह कार्यक्रम राबविण्याचे आव्हान आ. कुचे यांनी करून भाजपा जालना ग्रामीण नवनिर्वाचित जिल्हा पदाधिकारी यांनी आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूकीत भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेचे कामे करून केंद्र व राज्य शासनाच्या जन कल्याणकारी योजना तळागातील व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले आहे.

या बैठकीचे प्रास्ताविक जिल्हा सरचिटणीस गोविंद ढेंबरे यांनी केले तर आभार जिल्हा संघटन सरचिटणीस अनिलराव कोलते यांनी केले आहे.

---

# टेंभूर्णी येथील पवार परिवाराची परंपरागत केळीच्या पानांची गौरी!

**विशाल देशमुख । टेंभूर्णी -** येथील शिक्षक प्रमोद पवार यांच्या कुटुंबीयांनी पवार परिवाराची सुमारे १५३ वर्षांपासूनची परंपरागत केळीची गौरी स्थापण करण्याची परंपरा या ही वर्षी कायम ठेवली आहे.आमची ही गौरी फक्त एकच दिवसांची असते व तिचे पावित्र्य राखण्यासाठी दरवर्षी तिचे विसर्जन करुन नवीन गौरीची स्थापना करण्यात येते.अशी ही पवार परिवाराची परंपरागत एकमेव गौरी असल्यामुळे परिसरातील भाविक मोठ्या कुतुहलाने व भक्तीभावाने या ठिकाणी दर्शनासाठी येत असतातअसे सौ. योगिता दत्तात्रय पवार यांनी सांगितले.



# माहोऱ्यात तान्हाजी नगर मित्र मंडळाचा गणेशोत्सव उत्साहात

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** तालुक्यातील माहोरा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील तान्हाजी नगर मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सव जल्लोषात साजरा केला जात आहे. सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना झाल्यानंतर दररोज सकाळ-संध्याकाळ आरतीनंतर ढोल-ताशांच्या गजरात मुलांचा उत्साह उफाळून येतो.



शासनाच्या नियमांचे पालन करत संस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात असून रात्री आठ वाजल्यानंतर भजनी मंडळाचे भजन सत्र रंगते, ज्यामध्ये महिलांचा आणि पुरुषांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

या मंडळाचे अध्यक्ष अमय शेजूळ, उपाध्यक्ष उमेश एडसकर, कोषाध्यक्ष लखन हटकर, सचिव मंगेश शिंदे तसेच सल्लागार रमेश ढाले, विशाल इंगळे, शुभम इंगळे, सागर इंगळे, योगेश सुरडकर, योगेश ढाले, प्रदीप सोळंके, मयूर लहाने, कुणाल राऊत, विजय डुकरे, अतुल बोर्डे, दानिश शेख, कृष्णा गाढे, मंगेश सुरडकर, मंगेश पोपलघट, अभिषेक खरात, योगेश जाधव, विजय डहाके, सचिन पवार आदी सदस्य परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी करत आहेत. मंडळाच्या उपक्रमामुळे परिसरात आनंद, भक्तिभाव आणि ऐक्याचे वातावरण निर्माण झाले आहे.